महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

## दिन विशेष...

७८८ : आद्य श्री. शंकराचार्य यांचा जन्म.
१८८९ : जर्मनीचा हुकुमशहा व महत्त्वाकांक्षी सेनानी हिटलर यांचा जन्म.
१९६० : सुप्रसिध्द बासरीवादक पन्नालाल घोष यांचे निधन.
१९६८ : सुप्रसिध्द भारताचार्य चिंतामणराव विनायक वैद्य यांचे निधन.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७८,४९३.५४ | +५०४.८६ (०.६५%) |
| डॉलर | ₹ ९२.६० | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४२ | २६ |
| दिल्ली | ४० | २५ |
| मुंबई | ३८ | २७ |
| नागपूर | ४२ | २७ |
| पुणे | ३९ | २१ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १५९ किंमत : ५ रु. | पाने ४

## सुविचार

आपल्या आयुष्यातील प्रत्येक नातेसंबंध हे एक अमूल्य ठेवा आहे. त्यांची काळजी घ्या आणि त्यांचे महत्त्व समजून घ्या.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:०५ | संध्या-६:४८ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५७,३१५/- | २,७५,०००/- |

# भाजपा पश्चिम बंगालमध्ये बहुमताने सरकार स्थापन करेल

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केला विश्वास

वृत्तसंस्था । पुरुलिया

**पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. तृणमूल काँग्रेस, भाजपा आणि काँग्रेस अशा विविध राजकीय पक्षाचे दिग्गज नेते या निवडणुकीच्या प्रचारात उतरले आहेत. पश्चिम बंगालच्या अनेक शहरात नेत्यांच्या भव्य सभा, रॅली, बैठका सुरू आहेत. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप करत असल्याने राजकारण चांगलंच तापलं आहे.**



या पार्श्वभूमीवरच आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पश्चिम बंगालच्या पुरुलिया जिल्ह्यात सभा पार पडली. या सभेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुकीत भाजपा प्रचंड बहुमताने विजयी होईल आणि सरकार स्थापन करेल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला आहे.

मी सहसा निवडणुकीच्या काळात कोणताही अंदाज वर्तवत नाही. किंवा निकाल काय येईल? यावरही मी काही भाष्य करत नाही. मी अनेक वर्षांपासून निवडणूक लढवतो. पण अंदाज वर्तवण्याच्या अशा गोष्टी मी शक्यता टाळतो. मात्र, या निवडणुकीच्या अनुषंगाने जो कोणी मला भेटतो, तो प्रत्येकजण म्हणतो की यावेळी भाजपाचं सरकार निश्चित आहे. त्यामुळे या सर्वांचं मत मी ऐकल्यावर आणि माझा जेवढा राजकीय अनुभव आहे, त्यावरून मी आज सांगतो की पश्चिम बंगालमध्ये यावळी भाजपा प्रचंड बहुमताने सरकार स्थापन करेल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला.

### ➤ मोदींची तृणमूल काँग्रेसवर टीका

**पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचं क्रूर सरकार १५ वर्षांपासून सत्तेवर आहे आणि केंद्रात भाजपाचं सरकार ११ वर्षांपासून सत्तेवर आहे. पण या १५ वर्षांत तृणमूल काँग्रेसच्या गैरकारभाराने, भीतीने आणि भ्रष्टाचाराने पश्चिम बंगालमधील प्रत्येक कुटुंबाला भयभीत केलं आहे. याच काळात भाजपाच्या सुशासनावरील जनतेचा विश्वास अधिक वाढला आहे, असं म्हणत पंतप्रधान मोदींनी ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार टीका केली.**

**टीएमसीच्या मंत्र्यांनी हजारो तरुणांची फसवणूक केली : मोदी**

तृणमूल काँग्रेसच्या मंत्र्यांनी हजारो तरुणांची फसवणूक करून शिक्षक भरतीत घोटाळा केला आहे. टीएमसीच्या या जंगलशाहीत टक्केवारी

(पान २ वर)

# आम्हाला अणुहक्कांपासून कोणीही वंचित ठेवू शकत नाही

## इराणच्या अध्यक्षांनी अमेरिकेला दिलं आवाहन

वृत्तसंस्था । तेहरान



**अमेरिका–इराण युद्ध दि. ८ एप्रिल रोजी तात्पुरतं थांबलं. मात्र, अद्यापही या युद्धाबाबत कोणताही ठोस तोडगा निघाला नाही. पाकिस्तानच्या माध्यमातून दोन्ही देशांत शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. या चर्चेची दुसरी फेरी लवकरच सुरू होणार असल्याची माहिती देखील सांगितली जाते. पण असं असतानाही सध्या इराण आणि अमेरिकेत मोठा तणाव आहे. कारण अमेरिकेकडूनही होर्मुझच्या सामुद्रधुनीवर वर्चस्व मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा इराण करत आहे. त्यामुळे हा तणाव वाढत असल्याचं दिसून येत आहे.**

दरम्यान आता इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. आम्हाला अणुहक्कांपासून कोणीही वंचित ठेवू शकत नाही, असं मसूद पेझेश्कियन यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या वक्तव्याचा रोख एकप्रकारे अमेरिकेकडेच असल्याचं बोललं जात आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**मसूद पेझेश्कियन यांनी काय म्हटलं?**

सध्या सुरू असलेला संघर्ष तेहरान सन्मानाने संपवण्यासाठी प्रयत्न करत आहे. मात्र, कोणत्याही देशाला इराणला त्याच्या कायदेशीर अणुहक्कांपासून वंचित ठेवण्याचा अधिकार नाही. इराणचा युद्धाची

(पान २ वर)

## थोडक्यात

### अशोक खरातचे पाय खोलात; पोलीस कोठडीत झाली वाढ

**मुंबई ।** लैंगिक अत्याचार आणि शोषणाच्या पाचव्या प्रकरणात भोंदू बाबा अशोक खरातला नाशिक येथील एका सुट्टीकालीन न्यायालयाने २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. खरातला शनिवारी पाचव्या प्रकरणात औपचारिकरित्या अटक करण्यात आली. या प्रकरणात त्याच्यावर काळ्या जादूचा वापर करून आणि स्वतःला ईश्वराचा अवतार भासवून पीडित महिलेची फसवणूक केल्याचा आरोप आहे. रविवारी पोलिसांनी त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केले आणि पाच दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली.



### भर मैदानात हार्दिक–बुमराह भिडले

**दिल्ली ।** पाच वेळा विजेत्या ठरलेल्या मुंबई इंडियन्सची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली आहे. पंजाबविरुद्ध १९६ धावांचा बचाव करताना मुंबईची गोलंदाजी अक्षरशः कचखाऊ ठरली. मात्र, या पराभवापेक्षा सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडिओने चाहत्यांची धडधड वाढवली आहे. या व्हिडिओमध्ये जसप्रीत बुमराह कर्णधार हार्दिक पंड्याच्या एका निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करताना आणि त्याच्याशी हुज्जत घालताना दिसत आहे. मैदानावर नेमकं काय घडलं? – सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर व्हायरल झालेल्या व्हिडिओनुसार, सामन्याच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर बुमराहने हार्दिकला क्षेत्ररक्षणाबाबत काही सूचना केल्या होत्या. मात्र, हार्दिकने बुमराहचा सल्ला धुडकावून लावत स्वतःच्या मनाप्रमाणे फिल्डिंग सेट केली. त्यानंतर बुमराहने निराश होवून विषयचं सोडून दिला.

# राष्ट्रवादीत खळबळ! सुनेत्रा पवारांना मोठा धक्का; ३५ पदाधिकाऱ्यांचे तडकाफडकी राजीनामे

वृत्तसंस्था । मुंबई

**सांगलीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षांतर्गत संघर्ष आणखी उफाळला आहे. महापालिका गटनेत्याच्या विरोधात संताप व्यक्त करत तब्बल ३५ पदाधिकाऱ्यांनी शहर जिल्हाध्यक्षांकडे राजीनामे दिले आहेत. अजितदादांच्या निधनानंतर धाक राहिला नाही, मनमानी कारभार केल्याचा गंभीर आरोप थेट शहर जिल्हाध्यक्षांनी केला आहे.**

सांगली महापालिकेमध्ये स्वीकृत नगरसेवक पदाच्या निवडीवरून राष्ट्रवादी अजित पवार पक्षांतर्गत संघर्ष चिघळला आहे. पक्षाच्या दिगंबर जाधव आणि स्नेहल सावंत यांचे नाव अधिकृत लेटरहेडवर आले असताना ऐनवेळी गटनेते मैनुद्दीन बागवान यांनी जाधव यांचे नाव काढून अशोक मासाळ यांचे नाव घातले. या कारभारामुळे संतप्त झालेल्या ३५ शहर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी शहर अध्यक्ष जगदाळे यांच्याकडे राजीनामे दिले आहेत.

प्रदेशकडून दोन जणांची नावे आली. त्या पत्रावर असलेले एक नाव गट नेत्याने परस्पर बदलले. यामुळे पक्षाची बदनामी होईल असा मेसेज जाईल असे सांगितले. त्यांनी मनमानी कारभार करून पक्षाचा आदेश डावलून अधिकृत नाव न घालता दुसरे नाव घालण्याचे धाडस केले. त्यामुळे गटनेते मैनुद्दीन बागवान यांची पदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी होत आहे. याविरोधात पक्षात संतापाची लाट आहे. ज्या अशोक मासाळ यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देण्यात आली, त्यांच्यावरही जाधव यांनी निशाणा साधला. मासाळ यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशा दोन्ही पक्षांकडे अर्ज केला होता.

# नागपुरात गॅस गळतीमुळे स्फोट, एकाचा मृत्यू, १० जण जखमी

वृत्तसंस्था । मुंबई

**जिल्ह्यातील कामठी येथील गांधीनगर भाजी मंडी परिसरात रविवारी सकाळी सिलिंडरचा भीषण स्फोट होऊन अतुल उर्फ बंटी पानतावणे (४०) या तरुणाचा मृत्यू झाला असून, सुमारे १० जण जखमी झाले आहेत.**



पोलीसांच्या माहितीनुसार, पानतावणे कुटुंबीय सकाळी घरात असताना स्वयंपाकघरात गॅस गळतीमुळे प्रथम आग लागली आणि नंतर अचानक सिलिंडरचा स्फोट झाला. अतुल पानतावणे यांच्या पत्नी चहा बनवण्यासाठी स्वयंपाकघरात गेल्या असता, ही आग लागली. काही क्षणातच जोरदार स्फोट झाला. ही आग स्फोटानंतर काही वेळातच संपूर्ण घरात पसरली. घरातील जीवनावश्यक वस्तू, सोन्याचे दागिने, टीव्ही, फ्रिज, कपडे यांसह सर्व साहित्य जळून खाक झाले. या आगीत सुमारे ५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आग लागल्यानंतर पत्नी व मुले

(पान २ वर)

# कापसाची हमीभावावर मात, परभणीत ८ हजार ८०० रुपये भाव



वृत्तसंस्था । परभणी

हंगाम संपल्यानंतर आणि शेतकऱ्यांकडे असलेला बहुतांश कापूस विकला गेल्यानंतर खाजगी बाजारात कापसाच्या भावात दिवसेंदिवस वाढ होत आहे. सेलू येथे खाजगी बाजारपेठेत कापसाला तब्बल ८४७५ रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळाल्यानंतर परभणीच्या बाजारपेठेत शुक्रवारी (दि.१७) कापसाला ८ हजार ८०० रुपये असा प्रतिक्विंटल भाव मिळाला. या हंगामातला हा सर्वात विक्रमी दर असून शासनाच्या हमीभावापेक्षाही खाजगी बाजारपेठेत कापसाने पुढचा दर गाठला आहे.

# पाचोरा पोलिसांनी एसी चोरट्याला दाखवली कोठडीची हवा!

प्रतिनिधी । जळगाव

**पाचोरा शहरात एका इलेक्ट्रॉनिक व्यावसायिकाच्या गोदामातून अज्ञात चोरट्याने सुमारे ९४ हजार ५०० रुपये किमतीचे तीन एअर कंडिशनर (एसी) चोरून नेल्याची घटना नुकतीच उघडकीस आली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत संशयिताला मुद्देमालासह अटक केली आहे.**



नय्युम जहांगीर देशमुख यांच्या जारगाव (ता.पाचोरा) येथील अक्सानगरातील गोदामातून ९४ हजार ५०० रुपये किमतीचे गोदरेज कंपनीचे तीन एअर कंडिशनर्स कोणीतरी अज्ञात चोरट्याने १ ते १४ एप्रिल या कालावधीत चोरुन नेले होते. घडलेला प्रकार लक्षात आल्यानंतर देशमुख यांनी तत्काळ पाचोरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरुन भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल झाल्यावर पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम यांनी दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार, गुन्हे शोध पथकातील सहाय्यक फौजदार विलास पाटील तसेच वसीम शेख, श्रीकांत गायकवाड, योगेश पाटील, संदीप राजपूत, गणेश कुंवर यांनी गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने तपासाची चक्रे फिरवून संशयित रिहान हमीश शहा (२२, रा. हनुमानगर, पाचोरा) याला ताब्यात घेतले. रिहान शहा यानेच नय्युम देशमुख यांच्या गोदामातून तीन एअर कंडिशनर्स चोरी केल्याची कबुली दिली. त्याप्रमाणे चोरीस गेलेला ९४

(पान २ वर)

# जिवंत माजी नगरसेवकालाच ठरवले 'मयत'; मतदार फेरतपासणीत त्रुटी

वृत्तसंस्था । वाडा

मतदार यादी शुद्धीकरणासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विशेष फेरतपासणी प्रक्रियेतील धक्कादायक आणि गंभीर त्रुटी वाडा शहरात समोर आली असून, जिवंत असलेल्या माजी नगरसेवकास थेट मयत दाखविण्याचा प्रकार उघड झाल्याने प्रशासनाची कार्यपद्धतीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. लोकशाही प्रक्रियेच्या पवित्रतेवरच प्रश्न निर्माण करणाऱ्या या प्रकाराने शहरात खळबळ उडाली आहे. यामुळे नागरिकांकडून शासकीय यंत्रणेच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त केला जात असून संपूर्ण प्रक्रियेच्या

(पान २ वर)



# केळी पीकविमा घोटाळ्यातील दोषींवर कठोर कारवाई होणार

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिला इशारा

वृत्तसंस्था । जळगाव

**जिल्ह्यात उघडकीस आलेल्या बोगस केळी पिकविमा घोटाळ्याच्या चौकशीला प्रशासनाने आता गती दिली आहे. घोटाळ्याच्या मुळाशी जाऊन सत्य परिस्थिती उघड करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, कृषी विभाग, पोलीस यंत्रणा यांच्याकडून संयुक्त तपास सुरू आहे. या तपासात केवळ शेतकरीच नव्हे तर संबंधित अधिकारी, एजंट तसेच सीएससी केंद्र चालक यांच्या भूमिकेचाही बारकाईने अभ्यास केला जात आहे. या दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केळी पिकविमा घोटाळा संदर्भात महत्त्वाचे वक्तव्य केले असून त्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.**

### दोषींना कोणतीही सवलत नाही



या प्रकरणात सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर) केंद्र चालकांची भूमिका विशेषतः संशयास्पद मानली जात असून, त्यांच्यावरही कारवाईची प्रक्रिया सुरू झाली आहे. पिकविमा अर्ज भरताना किंवा ऑनलाइन नोंदी करताना गैरप्रकार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. काही ठिकाणी बनावट कागदपत्रांचा वापर करून विमा दावे दाखल करण्यात आल्याची शक्यता तपासात पुढे येत आहे. प्रशासनाने या घोटाळ्याकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले असून, दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असेही पालकमंत्री पाटील यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणा दोषींना शोधून काढण्यासाठी विविध स्तरांवर तपास करत आहे. आर्थिक व्यवहारांची साखळी, संबंधित व्यक्तींचे संपर्क आणि व्यवहारांची नोंद तपासली जात आहे.


पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केळी पिकविमा प्रकरणाबाबत जळगावात पत्रकारांशी संवाद साधला. आपली भूमिका मांडताना त्यांनी सांगितले की, केळी पिकविमा घोटाळ्यात केवळ शेतकरी नाही तर अधिकाऱ्यांची जबाबदारी मोठ्या प्रमाणात असल्याचे प्राथमिक निष्कर्षांवरून दिसून येत आहे. काही एजंटांनी शेतकऱ्यांना चुकीची माहिती देऊन, त्यांना आर्थिक लाभाचे आमिष दाखवून पिकविमा प्रक्रियेत सहभागी करून घेतले. तुम्ही ठराविक रक्कम द्या, आम्ही तुमच्या नावाने विमा काढतो,फ्फ अशा प्रकारच्या आश्वासनांमुळे अनेक शेतकरी या जाळ्यात अडकले, असेही त्यांनी नमूद केले. तपासादरम्यान अनेक प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी स्वतःहून चुकीची माहिती दिली की त्यांना फसवण्यात आले, याचा

(पान २ वर)

# रेल्वे प्रवाशांसाठी डोकेदुखी! अनेक रेल्वे गाड्या रद्द, तर काही विलंबाने धावणार

वृत्तसंस्था । अकोला

**रेल्वेच्या स्वयंचलित ब्लॉक प्रणालीचे काम होणार असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या असून काही गाड्या विलंबाने धावणार आहेत. वेळापत्रक कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागामार्फत पारस – गायगाव – अकोला विभागात अप व डाऊन दोन्ही मार्गांवर स्वयंचलित ब्लॉक प्रणाली बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या पायाभूत सुविधांच्या कामांच्या पार्श्वभूमीवर भुसावळ – बडनेरा विभागात काही रेल्वे गाड्या तात्पुरत्या स्वरूपात रद्द, तर काही गाड्या विलंबाने धावणार आहेत. २३ एप्रिल रोजी प्रवासी गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे.

(पान २ वर)

# संपादकीय

## ब्रिटनचे एक पाऊल पुढे

इराणने पूर्णपणे रोखून धरलेली होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्यासाठी फ्रान्स आणि ब्रिटनने एका आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचे आयोजन केले.सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्याच्या योजनांना पुढे नेण्यासाठी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर अनेक देशांसोबत बैठका घेतल्या, परंतु त्यात अमेरिकेचा समावेश केला नाही.अमेरिका–इस्रायल–इराण संघर्षामुळे हा महत्त्वाचा तेलमार्ग बंद झाला होता तो आता खुला झाला. जे देश संघर्षात सामील नाहीत आणि ज्यांनी तो सुरूही केलेला नाही त्यांच्या बैठका सुरू झाल्या आहेत. होर्मुझच्या नाकेबंदीचा जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. युद्ध कायमचे थांबावे यासाठी केवळ विधाने केली जात आहेत. प्रत्यक्षात दोन पावले मागे घेण्याची तयारी होताना दिसत नाही. या सगळ्यात प्रकर्षाने जाणवणारी एक बाब होती ती म्हणजे अमेरिका आणि ब्रिटन यांच्यातील विसंवादी सूर. दुसऱ्या महायुद्धानंतर असे क्वचितच पाहायला मिळाले. आताही ब्रिटनने फ्रान्ससोबत स्वतंत्र हालचाली सुरू केल्यामुळे भुवया उंचावल्या गेल्या. मात्र जसे दिसतेय ते खरे मानायचेच असे काही नाही. ब्रिटन अजूनही तटस्थ राहून उपयुक्त भूमिकाच बजावताना दिसतो आहे. फ्रान्सच्या मॅक्रॉन यांनी होर्मुझमधील जहाजांचे संरक्षण करण्याची मोहीम पूर्णपणे बचावात्मक असेल असे म्हटले. ही मोहीम केवळ युद्धात लढत नसणाऱ्या देशांद्वारे चालवली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.मॅक्रॉन आणि स्टार्मर यांनी इराणवर राजनैतिक आणि आर्थिक दबाव वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचे नेतृत्व केले. स्टार्मर यांनी इराणवर जागतिक अर्थव्यवस्थेला वेठीस धरल्याचा आरोप केला आहे. स्टार्मर आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात बिनसले असल्याच्याही चर्चा वारंवार पुढे येतात. मुळात स्टार्मर स्वतंत्रपणे जे काही करत आहेत, त्यामुळे अन्य देशांनाही लाभ होणार आहेच व संघर्षामुळे अमेरिकेची जी कोंडी झाली आहे त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी त्यांना मदत करण्याचाच स्टार्मर यांचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसते.फेब्रुवारीमध्ये इराणविरुद्ध अमेरिकेचे आणि इस्रायलचे युद्ध भडकले. तेव्हा अमेरिकेने ब्रिटनचाही ज्यात समावेश होता अशा आपल्या मित्रराष्ट्रांकडून मदतीची अपेक्षा केली. कारवाई सुरू करण्यापूर्वी विश्वासात घेतले गेले नसल्यामुळे मित्रराष्ट्रांनी नाराजी व्यक्त करत अमेरिकेला थंड प्रतिसाद दिला. स्टार्मर यांनीही कोणत्याही आक्रमक लष्करी कारवाईत सहभागी होण्यास स्पष्ट नकार दिला.पूर्वी किमान अलीकडच्या ज्ञात इतिहासात असे प्रथमच घडले होते. अमेरिकेने कोणतीही आंतरराष्ट्रीय कारवाई अथवा मोहीम सुरू केली की त्यात ब्रिटनचा सहभाग असायचाच. जेथे गरजच नाही किंवा रणनीतीच्या अंतर्गत अगोदर तसे ठरले असेल तरच अशा कारवाईच्या वेळी ब्रिटन अलिप्त असायचा. अन्यथा अमेरिका–ब्रिटनची कृती संयुक्त स्वरूपाचीच असायची. इराणच्या प्रकरणात स्टार्मर यांची भूमिका ठाम आणि सुसंगत राहिली. हा संघर्ष ब्रिटनचे युद्ध नाही असे त्यांनी अगोदरच स्पष्ट केले. ङ्गआम्ही या युद्धात ओढले जाणार नाही.वेगळा मार्ग स्वीकारण्यासाठी माझ्यावर खूप मोठा दबाव आणला गेला पण; मी माझा निर्णय बदलणार नाही, मी कोणापुढेही झुकणार नाही. या युद्धात सहभागी होणे हे आमच्या राष्ट्रीय हिताचे नाही आणि आम्ही तसे करणारही नाही. माझी भूमिका काय आहे, हे मला स्पष्टपणे ठाऊक आहेफ अशी स्टार्मर यांची स्पष्टोक्ती आहे. वरकरणी त्यांची भूमिका सुसंगत आहेच. त्यात कोणताही विरोधाभास दिसत नाही. तथापि, ब्रिटनकडून प्रथमच अमेरिकेच्या जाहीर भूमिकेच्या विरोधात अशी स्पष्टोक्ती केल्यामुळे जगात वेगळ्या तर्कांना उधाण आले.ब्रिटन आणि अमेरिकेतील माध्यमेही त्याला अपवाद नव्हती.

# पाणीटंचाई निवारण्यासाठी तत्काळ उपाययोजना : आ. भदाणे

## जि. प.च्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात झाली आढावा बैठक



प्रतिनिधी । धुळे

**धुळे ज्या ग्रामीणमधील गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई आहे. तिथे तातडीने टँकर सुरू करा, विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव मार्गी लावा. विहिरी तात्काळ अधिग्रहीत करा. प्रलंबित पाणीपुरवठा योजना मार्गी लावा. जलजीवन मिशन अंतर्गत येणाऱ्या समस्या तातडीने सोडवा. कामचुकार कंत्राटदारांवरही कारवाई करा, असे स्पष्ट निर्देश आ. राम भदाणे यांनी दिले. जिल्हा परीषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात धुळे तालुक्यासाठीच्या पाणीटंचाई निवारण, तातडीच्या उपाययोजना तसेच इतर समस्या सोडण्यासाठी तातडीची आढावा बैठक झाली.**




यावेळी आ. भदाणे यांनी निर्देश दिले. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, माजी कृषी सभापती प्रा.अरविंद जाधव, संघटन सरचिटणीस भाऊसाहेब देसले, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, माजी उपसभापती विद्याधर पाटील, प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे, गटविकास अधिकारी गायकवाड, अशोक सुडके आदी अधिकारी, तालुक्यातील सरपंच, सदस्य आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने जिल्हा परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते. आ. भदाणे म्हणाले, तालुक्यातील बऱ्याच गावांमधील जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे अपुर्ण आहेत. कंत्राटदारांनी ही कामे मार्गी लावावीत. बोरविहिर येथील जुने धरणावरील पाणी पुरवठा विहिरीसाठी चोवीस तास वीज पुरवठा करण्याचे निर्देशित केले.

जनावरांचा पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न उद्भवू नये. यासाठी प्रशासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिलेत. उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही नागरिकाची किंवा पशुधनाची पाण्यासाठी गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाला आ. भदाणे यांनी सूचना केल्यात. यावेळी बाळासाहेब भदाणे, प्रा. जाधव यांनी भूमिका मांडली. तर मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख यांनी उपाययोजना सांगितल्यात.

# मोगराणी येथे भटक्या कुत्र्यांचा हैदोस

## एकाच दिवशी लहान मुलांसह सात जणांना चावा

प्रतिनिधी । खांडबारा



**नवापूर तालुक्यातील मोगराणी गावात पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने अक्षरशः थैमान घालत एकाच दिवशी लहान मुलांसह सात जणांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मोगराणी येथे ४ वर्षीय ऋषी हा आपल्या आईसोबत शेतात गेला असताना एका पिसाळलेल्या कुत्र्याने त्याच्यावर अचानक झडप घालत प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात मुलाच्या डोक्यावर खोलवर जखमा झाल्या असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. मुलाच्या आर्त किंकाळ्या ऐकून आईने तत्काळ धाव घेत कुत्र्याला पिटाळून लावले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, हल्ल्यानंतर मुलगा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असल्याने घटनास्थळी भीषण परिस्थिती निर्माण झाली होती.

विशेषतः एका वृद्ध महिलेच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्या रक्तबंबाळ अवस्थेत उपचारासाठी दाखल झाल्या. सर्व जखमींना तातडीने खांडबारा ग्रामीण रुग्णालय येथे उपचारासाठी नेण्यात आले. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल कोकणी, अधिपरिचारिका मनीषा पवार, सुदाम वसावे आदींनी प्राथमिक उपचार केले. जखमांची गंभीरता लक्षात घेता सर्वांना पुढील उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालय येथे हलविण्यात आले आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण असून, पिसाळलेल्या भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**या घटनेदरम्यान त्या पिसाळलेल्या कुत्र्याने परिसरातील आणखी सात जणांनाही चावा घेतला. यात क्रिश दिलीप गावित (वय ९, ढवळीपाडा), हितेश कृष्णा प्रधान (वय ३, नावली), श्रेयश अनिल पाडवी (वय ९, मोगराणी), सुकरीबाई राजू कोकणी (वय ५४, मोगराणी), दिया विनोद कोकणी (वय ४.५, मोगराणी) तसेच कुशल अंबादास पवार (वय ८, मोगराणी) यांचा समावेश आहे.**



अक्षयतृतीयेच्या दिवशी सकाळी नंदुरबार येथील बाजारपेठेत मातीचे घागर तसेच डांगर व आंबे खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी अशी गर्दी केली होती.

# पान १ वरुन

### भाजपा पश्चिम बंगालमध्ये......

घेतल्याशिवाय कोणतंही काम होत नाही. मग अशा परिस्थितीत राज्यात उद्योग कसे येणार? त्यामुळे या ठिकाणी उद्योगधंद्यांना मोठा फटका बसतो. कारखाने तृणमूल काँग्रेसच्या भीतीने येत नाहीत. कंपन्या विश्वासाने येत असतात. कारखाने विश्वासावर चालतात. गुंतवणूक विश्वासाने येत असते. त्यामुळे आता माझ्या राजकीय अनुभवावरून मला खात्री आहे की ४ मे नंतर भाजपाचे मुख्यमंत्री पश्चिम बंगालमध्ये शपथ घेतील. मुख्यमंत्री आणि पंतप्रधान दोघेही भाजपाचे असल्याने पश्चिम बंगालचा विकास सध्याच्या गतीपेक्षा दुप्पट वेगाने होईल, असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

### आम्हाला अणुहक्कांपासून......

व्याप्ती वाढवण्याचा कोणताही हेतू नाही. तसेच आमच्या देशाची धोरणं प्रादेशिक शांतता व स्थिरता राखण्यावर केंद्रित आहेत. पण असं असलं तरी आमच्या अणुहक्कांपासून आम्हाला वंचित ठेवण्याचा अधिकार कोणालाही नाही. आमची मागणी आहे की सर्वांना समानतेच्या आधारावर वागवलं जावं. आमची मूलभूत भूमिका या प्रदेशात शांतता, स्थिरता आणि सुरक्षा जपण्यावर आधारितच आहे, असं मसूद पेझेश्कियन यांनी स्पष्ट केलं आहे. इराणने कोणताही संघर्ष सुरू केलेला नाही आणि इतर राष्ट्रांवर हल्ले करण्याचा आमचा कोणताही हेतू नाही.

### पाचोरा पोलिसांनी एसी......

हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याशिवाय, पाचोरा पोलीस ठाण्यात बुधवारी दाखल गुन्ह्यातील ३० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत दुसऱ्या एका संशयिताकडून हस्तगत करण्यात आली. दोन्ही गुन्ह्यांत पोलीसांनी दाखविलेली तत्परता आणि तीन तासात दोन्ही गुन्ह्यात चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केल्याने संबंधित तक्रारदार व परिसरातील नागरिकांनी पोलीस दलाचे कौतुक करुन आभार मानले आहे.

### केळी पिकविमा घोटाळ्यातील......

सखोल तपास केला जात आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याला सरसकट दोषी ठरविण्याऐवजी प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र छाननी केली जाणार आहे. शेतकरी हा या व्यवस्थेतील बळी आहे की सहभागी, हे निश्चित करण्यासाठी पुरावे, कागदपत्रे आणि व्यवहारांची पडताळणी केली जात आहे. अधिकाऱ्यांवरही कडक कारवाई – जे कोणी या केळी पिकविमा घोटाळ्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सहभागी असतील त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांना फसवणाऱ्या एजंटांवर तसेच गैरप्रकारात सामील अधिकाऱ्यांवरही कडक कारवाई होणार असल्याचे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले.

### रेल्वे प्रवाशांसाठी डोकेदुखी!......

२३ एप्रिल रोजी गाडी क्रमांक ११२१ भुसावळ ते वर्धा मेमू, गाडी क्रमांक ६१९०२ बडनेरा ते भुसावळ मेमू, गाडी क्रमांक ६११०१ भुसावळ बडनेरा मेमू, गाडी क्रमांक ११२२ वर्धा ते भुसावळ मेमू या गाड्यांचे रद्दीकरण केले आहे. २३ एप्रिल रोजी गाडी क्रमांक २०८२० ओखा – पुरी एक्सप्रेसला शेगांव ते श्री क्षेत्र नागझरी दरम्यान ०२ तास २५ मिनिटे विलंब होईल. गाडी क्रमांक ११०४० गोंदिया – कोल्हापूर एक्सप्रेस काटेपूर्णा ते शेगांव दरम्यान ०२ तास २० मिनिटे, तर गाडी क्रमांक १२४८५ हजुर साहिब नांदेड – श्री गंगा नगर एक्सप्रेस काटेपूर्णा ते शेगांव दरम्यान ०२ तास विलंबाने धावणार आहे. २३ एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्रमांक २२७२३ नांदेड – श्रीगंगानगर एक्सप्रेस ही गाडी अकोला येथे क्रॉसिंगमुळे सुमारे ३० मिनिटे विलंबाने धावेल.

### जिवंत माजी नगरसेवकालाच......

विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाडा शहरातील मतदार संख्या १२ हजार ९०० आहे. यात दुबार व मयत मतदारांचे नाव प्रक्रियेद्वारे पडताळणीचे काम सुरू आहे. मात्र वाडा नगरपंचायतीचे माजी नगरसेवक रामचंद्र दामोदर जाधव यांनी सन २०१८ ते २०२३ या कालावधीत नगरसेवक तसेच आरोग्य व स्वच्छता सभापती म्हणून काम पाहिले आहे. अनेक वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून कार्य केलेल्या व्यक्तीलाच प्रशासनाने मृत दाखविल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

### नागपुरात गॅस गळतीमुळे......

तात्काळ घराबाहेर पडण्यात यशस्वी झाली. मात्र, अतुल पानतावणे हे बेडरूममध्ये अडकून पडल्याने गुदमरून त्यांचा मृत्यू झाला. आग विझवण्याच्या प्रयत्नात विनय पानतावणे, नितीन पानतावणे तसेच संध्या ढवळे यांच्यासह इतर काही जण किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# शहादा येथील चावरा स्कूलच्या चौकशीचे आदेश

प्रतिनिधी । शहादा

शहरातील चावरा इंग्लिश स्कूल या खाजगी शाळेच्या विरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत शिक्षण विभागाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शाळेकडून विद्यार्थ्यांचा मानसिक छळ व आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. ग्राहक पंचायतीचे शहादा अनिल भामरे यांनी जि.प. कडे केली आहे.

# तालुका खरेदी-विक्री संघाच्या सभापतिपदी माधुरी सिसोदे तर उपसभापतिपदी साहेबराव गोसावी

प्रतिनिधी । दोंडाईचा

**शिंदखेडा तालुका खरेदी–विक्री संघाची निवडणूक गतवर्षीच राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध झाली.**



सभापती व उपसभापतीपदासाठी आज निवडणूक घेण्यात आली. यात नरडाणा येथील भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा माधुरी मधुकर सिसोदे यांची सभापतिपदी तर मेथी येथील माजी पं.स.सदस्य साहेबराव गोसावी यांची उपसभापतिपदी बिनविरोध आली. निवड करण्यात शिंदखेडा तालुका खरेदी–विक्री संघाची स्थापना सन १९५७ मध्ये झाली आहे. यात माधुरी सिसोदे या प्रथमच महिला सभापती म्हणून निवडून आल्या आहेत. यावेळी दोंडाईचा शाखा प्रभारीपदी सुराय येथील गुलाब पाटील, शिंदखेडा शाखा प्रभारीपदी विरदेल सरपंच सुवर्णा बेहेरे, नरडाणा शाखा प्रभारीपदी शामसिंग गिरासे यांची निवड करण्यात आली. यावेळी माजी जि.प. उपाध्यक्ष महावीरसिंह रावल, माजी सभापती रघुवीर बागल, माजी सभापती जिजाबराव सोनवणे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डी.एस. गिरासे, संचालक राजेंद्र बागुल, भूपेंद्र निकम, श्रावण आहिरे, भालेराव बेहेरे, उमेश गिरासे, प्रमोद पवार, प्रविण पाटील, गुणवंत सूर्यवंशी, सुनिल पाटील, भीमसिंग गिरासे, शंकर जाधव, राजेंद्र पाटिल, महेंद्र खैरनार उपस्थित होते.

# नगराध्यक्षांच्या दिशेने भिरकावली काळीपट्टी

## शहादा पालिकेच्या सर्वसाधारण सभेत ७ विषय नामंजूर, ४७ विषयांना मंजुरी

प्रतिनिधी । शहादा

**येथील पालिकेच्या सर्वसाधारण सभेप्रसंगी बांधकाम सभापतींनी नगराध्यक्षांच्या दिशेने काळीपट्टी भिरकावल्याने काहीकाळ सभेत तणाव निर्माण झाला होता. मात्र, नगराध्यक्षांनी संयम दाखवत सभेचे कामकाज सुरु ठेवले.**



शहादा पालिकेची सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, उपनगराध्यक्षा माधवी पाटील, मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या सभेत विषय पत्रिकेवरील ६४ विषयांपैकी ४७ विषयांना मंजुरी देण्यात आली तर सात विषय नामंजूर करुन नऊ विषयांना स्थगिती देण्यात आली. यापूर्वी झालेल्या दोन सभांमध्ये अभूतपूर्व गोंधळ व शाब्दिक वादंगाच्या पार्श्वभूमीवर काल दि. १७ रोजी झालेल्या सभेत ४७ विषय मंजूर झाले असले तरी नामंजूर व स्थगित विषयांबाबत नागरिकांमध्ये संभ्रम कायम आहे.

विषय समित्यांचे सभापती, नगरसेवक व सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. सभेत विविध विषयांवर चर्चा सुरू असताना अधिकारी व कर्मचाऱ्यांवर रोष व्यक्त करण्यात आला. स्वच्छता विभागातील अधिकारी व कर्मचारी योग्य माहिती देत नसल्याची तक्रार आरोग्य सभापती सुनील पाटील यांनी केली. तर काही कर्मचारी स्वतः च पालिकेची कंत्राटी कामे घेत असल्याचे उघडकीस आल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी नगरसेवकांनी केली. त्यामुळे नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांबाबत कायदेशीर तरतुदी तपासून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व विभाग प्रमुखांनी नगरसेवकांना अधिकृत माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देशित केले. उपनगराध्यक्षा माधवी पाटील यांनीही पालिकेच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कायदेशीर व परिपूर्ण देण्याची मागणी सभेत केली. सभेत अनेक विषयांवर सविस्तर चर्चा होऊन ६४ विषयांपैकी ४७ विषयांना मंजुरी देण्यात आली.

सभेत आरोग्य सभापती सुनील पाटील, ज्ञानेश्वर चौधरी, ललित छाजेड, प्रदीप ठाकरे, दीपक कोळी, कल्पेश पटेल, असीम तेली, सागर मराठे, ॲड. दानिश पठाण यांनी सहभाग घेतला. दरम्यान, बांधकाम सभापती संतोष वाल्हे यांनी आपल्या मागण्यांबाबत निषेध व्यक्त करीत नगराध्यक्षांच्या दिशेने काळीपट्टी भिरकावली. मात्र नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी संयमी भूमिका घेत सभेचे कामकाज सुरू ठेवले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# भडगाव येथे गावठी पिस्तूलातून गोळी झाडून तरुणाने संपवली जीवनयात्रा!

## मोबाईलवर आलेल्या कॉलवर बोलणे झाल्यावर घेतला टोकाचा निर्णय

प्रतिनिधी । भडगाव

**शहरातील खुशाल आप्पा नगरातील रहिवासी असलेल्या २२ वर्षीय तरुणाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. स्वप्निल प्रवीण शिंपी असे मयत तरुणाचे नाव आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

स्वप्निल सकाळी आपल्या कुटुंबीयांसोबत आणि मित्रांसोबत नेहमीप्रमाणे वावरत होता. मात्र, दुपारच्या सुमारास त्याला एक फोन आला. हा फोन आल्यानंतर स्वप्निल अचानक अस्वस्थ झाला. कोणालाही काहीही न सांगता तो आपल्या खोलीत गेला आणि त्याने आतील बाजूने दरवाजा बंद करून घेतला. काही क्षणांतच खोलीतून गोळीबाराचा मोठा आवाज आला.





आवाज ऐकताच घाबरलेल्या नातेवाईकांनी धाव घेत खिडकीतून आत पाहिले असता, स्वप्निल रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसून आला. कुटुंबीयांनी तातडीने दरवाजा तोडून त्याला बाहेर काढले आणि उपचारासाठी भडगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला तात्काळ जळगाव जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच भडगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळावरून गावठी पिस्तूल आणि स्वप्निलचा मोबाईल फोन जप्त केला आहे. स्वप्निलला नक्की कोणाचा फोन आला होता आणि तो इतका अस्वस्थ का झाला? याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. सध्या पोलिसांनी मोबाईलचे लॉक उघडून त्यातूनच आत्महत्येचे नेमके गूढ उकलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेचा पुढील तपास भडगाव पोलीस करत आहेत.

# सामाईक क्षेत्रधारक शेतकऱ्यांनाही जिल्हा बँक कर्ज देणार

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील सामाईक क्षेत्रात जमीन असलेल्या शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे अखेर दूर झाल्या आहेत. तहसीलदारांच्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे अशा शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा महत्वपूर्ण निर्णय बँकेने घेतला आहे. त्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची बैठक शनिवारी अध्यक्ष संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला संचालक आमदार किशोर पाटील, माजी मंत्री गुलाबराव देवकर, डॉ. सतीश पाटील, माजी आमदार चिमणराव पाटील तसेच कार्यकारी संचालक जितेंद्र देशमुख आदींची उपस्थिती होती.

बैठकीत शेतकरी हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये विशेषतः १ एप्रिल २०२३ पासून अनिष्ट तफावतीत असलेल्या विकास सोसायट्यांवरील व्याज आकारणी कायमस्वरूपी बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे सोसायट्यांच्या वाढत्या आर्थिक तफावतीला आळा बसणार आहे. बँकेने सुमारे २०४ कोटी रुपयांचे व्याज माफ करून या संस्थांना मोठे आर्थिक बळ दिले आहे. त्यामुळे अनेक विकास सोसायट्यांना दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

### कृषी अर्थव्यवस्थेला मिळेल चालना

दरम्यान, सामाईक क्षेत्रधारक शेतकऱ्यांना कर्ज न देण्यासंदर्भात बँकेने यापूर्वी काढलेल्या परिपत्रकाला जिल्हाभरातून तीव्र विरोध झाला होता. विविध भागांतील शेतकरी आणि विकास संस्थांनी बँकेकडे आपली नाराजी व्यक्त केली होती. संचालक मंडळाच्या बैठकीपूर्वीच शेतकऱ्यांनी लेखी निवेदने देऊन हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली.

शेतकरी प्रतिनिधींनी थेट संचालक मंडळाची भेट घेत आपली बाजू मांडली. या तीव्र विरोधाची दखल घेत बँकेने आपला निर्णय मागे घेत सुधारित धोरण जाहीर केले. त्यानुसार, यापुढील काळात सामाईक क्षेत्रधारकांना कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. एकूणच, जिल्हा बँकेच्या या निर्णयांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### पिंप्राळ्यात मोफत आरोग्य तपासणी

**जळगाव ।** शहरातील पिंप्राळा परिसरात सारांश फाउंडेशनतर्फे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले होते. महात्मा जोतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सारांश फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलू इंगळे यांच्यामार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आली. श्री चामुंडा माता होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, चिंचोली, जळगाव यांचे या कार्यक्रमात सहकार्य लाभले, यात स्त्री रोग विभागाच्या डॉ. अमिता श्रीवास्तव, नेत्र रोग विभागाचे डॉ. जयेश वाल्हे, डॉ. स्वाती सोनवणे व संपूर्ण डॉक्टरांची टीम यात सहभागी होती.

### सोयगाव येथे खरेदी केंद्र सुरू करण्याची भाजपची मागणी

**सोयगाव ।** तालुक्यात यंदाच्या रब्बी हंगामात ज्वारी पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी झाल्याने उत्पादन वाढले आहे. मात्र, बाजारात ज्वारीला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर सोयगाव येथे हमीभावावर ज्वारी खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावे, अशा मागणीचे निवेदन शहर भाजपच्या वतीने तहसील कार्यालयात सादर करण्यात आले आहे. ज्वारीचे दर घसरल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसत असून उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने त्वरित हस्तक्षेप करून खरेदी केंद्र सुरू करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तालुक्यातील ज्वारी पेरणी क्षेत्र यंदा लक्षणीय वाढली असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी हमीभावाने खरेदी सुरू करणे अत्यावश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# अमळनेरात आखाजी महोत्सव उत्साहात साजरा



प्रतिनिधी । अमळनेर

**खान्देशातील आखाजी महोत्सव हा अहिराणी संस्कृतीतील महत्वाचा सण असून गौराई, झोक्यावरची गाणी , जात्यावरील गाणी या रूढी परंपरा जतन करून त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. पहिला आखाजी महोत्सव प्रचंड गर्दीने यशस्वी झाला आहे. त्यामुळे हा कार्यक्रम शासकीय आणि मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा आणि यासाठी शासकीय निधी मिळवून देण्यासाठी सांस्कृतिक मंत्री आणि शासनाकडे प्रयत्न करेल, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी केले.**

खान्देश साहित्य संघतर्फे अमळनेर येथील एलआयसी कॉलनीत आखाजी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी होते. राजेश पांडे पुढे म्हणाले की ,मला अमळनेर सोडून ३८ वर्षे झाली मात्र अहिराणीची गोडी कमी झाली नाही म्हणून अहिराणीतून बोलत आहे. महिलानी या आधुनिक जगातही ही परंपरा टिकवून ठेवावी. यावेळी आमदार अनिल पाटील यांनी सांगितले की महिलांनी अजूनही रूढी,परंपरा जतन करून ठेवल्या ही अभिमानास्पद बाब आहे. माजी आमदार साहेबराव पाटील यांनीही अहिराणीत फटकेबाजी केली. प्रास्ताविक संघाचे जिल्हाध्यक्ष शरद धनगर यांनी तर स्वागतपर भाषण स्वागताध्यक्ष कृउबा सभापती अशोक पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे साहित्य संघाचे सचिव रमेश बोरसे, खजिनदार प्राचार्या रत्ना पाटील, ज्येष्ठ अहिराणी साहित्यिक कृष्णा पाटील, कवी हिरामण कंखरे, गोकुळ बागुल, शाहीर नाना पाटील , भाऊसाहेब देशमुख, जयवंतराव पाटील, डॉ. अनिल शिंदे , दिनेश नाईक, एल.टी. पाटील उपस्थित होते. सभापती अशोक पाटील, नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर , उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, ॲड.व्ही.आर.पाटील,विक्रांत पाटील, डॉ अविनाश जोशी, डॉ डिगंबर महाले आदींनी योगदान दिले.

# प्रा. मधुरा डांगे यांच्या 'स्वसंवेद्य' काव्यसंग्रहाचे थाटात प्रकाशन

प्रतिनिधी । जळगाव

**प्रा. मधुरा डांगे यांच्या स्वसंवेद्य या दुसऱ्या काव्यसंग्रहाचा ला. ना. हायस्कूलच्या गंधे सभागृहात एका सोहळ्यात थाटात प्रकाशन करण्यात आले.**



यावेळी व्यासपीठावर मध्यप्रदेशातील नर्मदालय, लेपा येथील पू. विशुद्धानंदा भारती, प्रसिद्ध वक्ते प्रा. प्रकाश पाठक, पू. नृसिंह विजयेंद्र सरस्वती, श्रीराम मंदिर संस्थांनचे ह.भ.प. मंगेश महाराज जोशी कल्याणी डांगे व प्रा. मधुरा डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नृसिंह सरस्वती यांनी बोलताना महाराष्ट्र ही काव्याची अभंगाची भूमी असून मधुरा यांनी त्यांच्या परिवाराचा वारसा समृद्ध केला आहे, त्यामुळे पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा त्रिलोकी झेंडा हे वाक्य सार्थ ठरेल, असे प्रतिपादन केले.

विशुद्धानंदा भारती यांनी मधुरा डांगे यांच्या कविता म्हणजे सहजपणे आलेल्या भावना असून त्यांनी स्वतः स्वतःशी केलेला तो संवाद आहे. त्यांच्या काव्यांवर अध्यात्माचा प्रभाव असून ते आनंदयात्रीचे लेखन आहे. इतिहास आणि पुरातत्व विषयात उच्च शिक्षण घेऊन संगीत विशारद असताना प्रा. मधुरा यांनी केलेल्या काव्यरचना अप्रतिम आहे असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप करताना प्रा. प्रकाश पाठक यांनी मधुरा यांच्या कविता सूक्ष्म व खोल असून कमी शब्दात मोठा आशय व्यक्त करणाऱ्या आहेत. सुख मिळणे कठीण नसतं, मात्र आनंद मिळणे कठीण असतो. काव्यसंग्रहाच्या नावाप्रमाणे हा स्वतःशी मोठा, प्रामाणिक, पारदर्शी संवाद आहे. भगवंत ज्ञानाने, कर्माने नाही तर भक्तीने कळतो. प्रा. डांगे यांच्या या कवितेतील शब्दांना लवकरच स्वरांची जोड मिळो, अशा त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या. प्रारंभी श्रीराम महाराज जोशी यांनी शांतीमंत्र पठण केला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक मधुरा डांगे यांनी तर सूत्रसंचालन प्रतिमा याज्ञिक यांनी केले.

# बोहरा स्कूल सीबीएसई दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १०० टक्के

प्रतिनिधी । पारोळा

येथील बोहरा सेंट्रल सीबीएसई स्कूलने १० वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. परीक्षेत एकूण १२९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी प्रथम जिज्ञासा गणेश पाटील (९३.४ टक्के), द्वितीय गौरी संदीप माळी (९२.४), तृतीय मोक्षदा रवींद्र चौधरी (९२.२) आणि समर्थ रमेश बोरसे (९२.२) टक्के गुण मिळवून यश संपादन केले. तसेच सलोनी जितेंद्र बाविस्कर ९१.६ टक्के, नितेश अतुल सोनवणे ९१.६ टक्के या विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळवले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा संस्थेचे चेअरमन सुरेंद्र बोहरा यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन कौतुक करून उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

# काँग्रेसचे संघटन सृजन अभियान संपन्न




प्रतिनिधी । अमळनेर

**येथील गलवाडे रोडवरील अंबिका मंगल कार्यालयात १७ एप्रिल रोजी महाराष्ट्रभर चाललेल्या काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियानाचे निरीक्षक सायंकाळी ४ वाजता दाखल झाले. जवळपास जुने, नवे काँग्रेसप्रेमी ५५० ते ६०० कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात औपचारिक रित्या सर्व निरीक्षकांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात काँग्रेस कमिटी अध्यक्ष भागवत केशव सूर्यवंशी यांनी संघटन सृजन अभियान म्हणजे संघटनेचा आढावा घेणे, व शक्य असल्यास संघटनेत बदल करणे, जेणेकरून संघटना कृतिशील होऊन, काँग्रेसची ध्येयधोरणे, उपक्रम कार्यकर्त्यांमार्फत तळागाळातल्या लोकांपर्यंत जाऊन, संघटना बळकट व प्रभावी झाली पाहिजे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांच्या चाचपणीची प्रक्रिया म्हणजे संघटन सृजन अभियान असे समजावले.**

जळगाव जिल्ह्यातील जिल्हाध्यक्षांबाबत मते जाणणारे काँग्रेस पक्षाचे निरीक्षक प्रमोद कुमार जयंत, तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे निरीक्षक आरिफ बेग मिर्झा, डॉ. अरविंद कोलते व जळगाव जिल्हाध्यक्ष बाळासाहेब प्रदीप पवार यांनी, संघटन सृजन अभियानाबद्दल माहिती दिली. त्यांनी आलेल्या पदाधिकाऱ्यांची, कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यासाठीची पद्धत सांगितली. सूत्रसंचालन शहराध्यक्ष श्री गजेंद्र साळुंखे यांनी केले. त्यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निरीक्षक श्री प्रमोद कुमार जयंत यांनी जिल्हाध्यक्षांबाबत एका बंद खोलीत पदाधिकाऱ्यांची कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. तर दुसऱ्या खोलीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे निरीक्षक, डॉ.अरविंद जी कोलते, आरिफ बेग मिर्झा साहेब यांनी, अमळनेर तालुक्याच्या काँग्रेसचा तालुकाध्यक्ष कोण असावा? याविषयी भेटणाऱ्यांची मते जाणून घेतली. ही प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात रात्री ८ वाजेपर्यंत चालली.

६०० जणांच्या उपस्थितीत अमळनेरचे जवळपास ५/६ कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षपदासाठी फार्म भरला होता. तर ६ते८ कार्यकर्त्यांनी अंमळनेर तालुका काँग्रेस अध्यक्षपदासाठी आपले फार्म निरीक्षकांना दिले. अशा प्रकारे संघटन सृजन अभियान कार्यक्रम शांततेने पार पडला.

# सिव्हिल हॉस्पिटलमधून रिक्षा चोरणारा भामटा जिल्हापेठ पोलिसांच्या जाळ्यात

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) परिसरातील गेट क्रमांक ३ च्या पार्किंगमधून रिक्षा चोरी करणाऱ्या संशयिताला जिल्हापेठ पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. त्याच्याकडून ७५ हजार रुपये किमतीची रिक्षा जप्त करण्यात आली आहे.**



सिव्हिल हॉस्पिटलच्या पार्किंगमधून एमएच १९ बीजे ४०२५ या क्रमांकाची तीन चाकी ॲपे रिक्षा दि. १२ एप्रिल रोजी चोरीला गेली होती. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी प्रभारी अधिकारी अनिल वाघ यांनी विशेष पथक तयार केले होते.

तपासादरम्यान तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे, रामेश्वर कॉलनी (मेहरूण) येथे राहणारा कल्पेश ज्ञानेश्वर इंगळे याच्याकडे एक पॅजो रिक्षा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्याचा शोध घेतला असता तो जळगाव शहरात असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. पथक पेट्रोलिंगवर असताना पांडे डेअरी चौकातील एम.एस. ई.बी. ऑफिसजवळ सदर रिक्षा दिसली. पोलिसांनी रिक्षा थांबवून चालकाची विचारपूस केली असता त्याने आपले नाव कल्पेश ज्ञानेश्वर इंगळे (वय ३२, रा. शांती नारायण नगर, रामेश्वर कॉलनी, मेहरूण, जळगाव, मूळ रा. तोंदे ता. शिरपूर जि. धुळे) असे सांगितले. अधिक चौकशी केली असता त्याने ही रिक्षा सिव्हिल हॉस्पिटलमधून चोरल्याची कबुली दिली.

# शिक्षण, निरंतर वाचनाने डॉ. बाबासाहेबांना शोषणाविरुद्ध लढण्याचे अक्षय मनोबल दिले : विजय लुल्हे

## साखळी पद्धतीने अभिवाचन उद्घाटन सोहळ्याप्रसंगी केले मार्गदर्शन

प्रतिनिधी । जळगाव

ग्रंथप्रेमी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व विद्यार्थी विकास प्रतिष्ठान संचलित विद्यार्थी सहाय्यक समिती, जळगाव संस्थेच्या रजत महोत्सवी वर्षाच्या औचित्याने भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम पुस्तक भिशीचे संस्थापक अध्यक्ष विजय लुल्हे यांच्या प्रेरणेने व समितीचे सर्वेसर्वा डॉ. एस. एस. राणे (माजी प्राचार्य) यांच्या पाठिंब्याने अभिवाचन उपक्रमाचा शुभारंभ समितीच्या वसतिगृहात रामानंद नगर येथे १४ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रविण सोनवणे (कार्यालय अधिक्षक) असून प्रमुख अतिथी संदिप शिंपी उपस्थित होते.



साखळी पद्धतीने अभिवाचन उपक्रमाचे अनोखे उद्धाटन ज्ञानपीठ पुरस्कृत कादंबरी ययाती , साहित्य अकादमी पुरस्कृत आत्मकथन काळ्या निळ्या रेषा , वैचारिक वाचन व आत्मचरित्र म खाली जमीन वर आकाश या ग्रंथांचे अग्रपूजन विजय लुल्हे यांनी करून वाचन चळवळीला प्रेरणादायी असलेली सफरद हाशमी यांच्या किताबें या कवितेचे शैलीदार वाचन करून अभिवाचन उपक्रमाचे अभिनव पद्धतीने उद्धाटन केले.

उद्धाटनपर मार्गदर्शन वाचन चळवळीचे कार्यकर्ते विजय लुल्हे म्हणाले की, शिक्षण व निरंतर वाचनाने डॉ.बाबासाहेबांना शोषणाविरुद्ध लढण्याचे अक्षय मनोबल दिले.

बाबासाहेबांचे ग्रंथ वाचन व ग्रंथप्रेम केवळ छंद नसून ज्ञान, मानव मुक्ती व सामाजिक परिवर्तनाचे साधन होते.

निरंतर वाचनातून ज्ञानार्जन हेच डॉ. बाबासाहेबांच्या आयुष्याचे ध्येय होते. उत्पन्नातील १० % रक्कम पुस्तक खरेदीसाठी खर्च करण्याचे आवाहन ते सदैव करीत. केवळ पुस्तकांसाठी म राजगृह म नामक पुस्तकांचे घर बांधणारे ते जगातील एकमेव ग्रंथप्रेमी होते. त्यांच्या वैयक्तिक ग्रंथालयात ५०००० पेक्षा जास्त पुस्तके होती. डॉ. बाबासाहेबांनी ३२ पदव्या प्राप्त केल्या. २२ ग्रंथांचे लेखन केले. बाबासाहेबांना १२ भाषा अवगत होत्या त्यात प्रामुख्याने संस्कृत, पाली यांसह फ्रेंच, जर्मन, फारसी या भाषांवर प्रभुत्व होते, असे लुल्हे यांनी सांगितले.

# मुक्ताईनगरात पुढील वर्षापासून शासकीय तंत्रनिकेतन सुरू

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मंजूर असलेल्या शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) संस्थेच्या सुरूवातीचा मार्ग मोकळा झाला असून, पुढील शैक्षणिक वर्षापासून ही संस्था सुरू होणार आहे. यासाठी विधान परिषद आ. एकनाथराव खडसे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.**

आ. खडसे यांनी ७ मार्च २०२५ रोजी विधान परिषदेत उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक मंत्री सुनेत्राताई पवार यांनी लेखी पत्राद्वारे सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या पत्रात संस्थेचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. सध्या तंत्रनिकेतनाच्या मुख्य इमारतीचे सुमारे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे.

# शिक्षण विभागाचा बोगस कारभार खपवून घेतला जाणार नाही : आ. सत्यजीत तांबे

## ठोस उपाययोजना न झाल्यास २५ मेपासून बेमुदत धरणे आंदोलनाचा दिला इशारा

प्रतिनिधी । यावल

**राज्यातील शालेय शिक्षण विभागामध्ये सुरू असलेल्या अंधाधुंदी, गोंधळ आणि प्रशासकीय कामकाजाविरोधात आमदार सत्यजीत तांबे यांनी राज्याचे शिक्षण आयुक्तांना पत्र दिले. उत्तर महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्याचं नमूद करत तात्काळ ठोस उपाययोजना न झाल्यास २५ मे २०२६ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा देखील दिला.**

पत्रात नमूद केलेल्या माहितीनुसार नाशिक पदवीधर मतदारसंघातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. शिक्षक, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक आणि प्रशासन यांच्यात परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. संपूर्ण यंत्रणा दिशाहीन झाल्याचे चित्र आहे. एसआयटी चौकशीच्या नावाखाली लहानसहान कामेही



प्रलंबित ठेवली जात असून प्रशासनाकडून केवळ तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असल्याची टीकाही त्यांनी केली आहे. याशिवाय शिक्षण विभागातील अनेक प्रश्न हे आर्थिक नसून दैनंदिन प्रशासकीय कामकाजाशी संबंधित असतानाही वारंवार अर्थसंकल्पाचे कारण पुढे केले जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करत शिक्षकांवर जनगणना, मतदार नोंदणी, बी एलओ यासारख्या विविध शासकीय कामांचा अतिरिक्त भार टाकला जात असल्यामुळे त्यांच्या अध्यापनाच्या मुख्य कार्यावर परिणाम होत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणापेक्षा अहवाल, लेखापरीक्षण आणि पूरक कामांवर अधिक भर दिला जात असल्याची बाबही चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले.

आमदार सत्यजित तांबे यांच्या मागण्यांमध्ये उत्तर महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा सखोल आढावा यादरम्यान आमदार तांबे यांनी मुख्य शिक्षण आयुक्तांकडे तात्काळ अंतर्गत बैठक घेऊन सर्व प्रश्नांचा सखोल आढावा घेण्याची मागणी केली आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हा शिक्षण अधिकारी, उपसंचालक, शिक्षक संघटना, संस्थाचालक, विद्यार्थी व पालक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पुणे येथे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संयुक्त बैठक आयोजित करून प्रलंबित प्रश्नांवर ठोस व दीर्घकालीन निर्णय घ्यावेत, अशी मागणी देखील केली आहे.

२५ मे पासून शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन या सर्व शैक्षणिक विषयांवर ठोस निर्णय न झाल्यास २५ मे २०२६ पासून मुख्य शिक्षण आयुक्तांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल आणि प्रश्न निकाली निघेपर्यंत ते सुरूच राहील असा इशारा देखील आमदार तांबे यांनी दिला आहे.

### ➤ आंदोलन हे माझ्यासाठी नवीन नाही

**आ.तांबे सत्यजीत तांबेंसाठी आंदोलन हे नवीन नाही वयाच्या १८ व्या वर्षापासून विविध चळवळींत सक्रिय सहभाग ठेवत वारंवार शिक्षणाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात आवाज उठवला आहे. जुनी पेन्शन योजना असो, विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळून देणे, असो यांसह विविध प्रश्नांचा शासनाकडे पाठपुरावा केला आहे. अधिवेशनात देखील शैक्षणिक प्रश्नांवर आमदार तांबे यांनी आक्रमक भूमिका घेऊन वेळोवेळी प्रश्न सोडवले आहेत.**

## दीपनगरात महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

प्रतिनिधी । भुसावळ

तालुक्यातील दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रात राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सव समितीच्या वतीने महात्मा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नवीन मनोरंजन केंद्र येथे सकाळी १०.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता विराज चौधरी होते. सुरुवातीला महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राजेंद्र माळी यांनी 'मी ज्योतीराव फुले बोलतोय' हे प्रभावी एकपात्री नाटक सादर करत महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांच्या सादरीकरणातून फुले यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा उपस्थितांना मिळाली.

## थोडक्यात

### शिंदे इंटरनॅशनल स्कूलची निकालाची परंपरा कायम

**पाचोरा ।** सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीबीएसई बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. पाचोरा येथील शिंदे इंटरनॅशनल स्कूलने यंदाही आपली यशस्वी परंपरा कायम ठेवत सलग सातव्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशामुळे शाळेच्या यशोगाथेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रेरणादायी वातावरण यामुळे विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करत शाळेची परंपरा पुढे नेली आहे. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष पंडितराव शिंदे, उपाध्यक्ष नीरज मुणोत, सेक्रेटरी अॅड. जे. डी. काटकर, सहसचिव डॉ. शिवाजी शिंदे, संचालक अमोल शिंदे, पूजा शिंदे, डॉ. विजय पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

### रायसोनी स्कूल येथे अक्षयतृतीया, परशुराम जयंती उत्साहात

**जळगाव ।** बी.यू.एन. रायसोनी स्कूल, सीबीएसई पॅटर्न, प्रेमनगर, जळगांव येथे दि. १८ रोजी अक्षय तृतीया व भगवान परशूराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात पालक-शिक्षक संघाच्या सदस्य, अश्विनी जाधव व प्रसाद कुलकर्णी यांच्याहस्ते भगवान परशुराम व सरस्वती देवी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच आरती करून करण्यात आली. इयत्ता नर्सरी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी फॅन्सी ड्रेस स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी भगवान परशुराम, भगवान विष्णू, लक्ष्मी देवी, कुबेर देव, व्यास ऋषी, श्री गणेश, श्री कृष्ण, द्रौपदी, युधिष्ठिर, सुदामा, गंगा व अन्नपूर्णा यांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांचे मन मोहून घेतले.

## महाराष्ट्र शिव वाहतूक सेनेच्या जळगाव जिल्हाप्रमुखपदी नंदू पाटील यांची नियुक्ती

प्रतिनिधी । जळगाव

**शिवसेना मुख्यनेते आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार तसेच जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शिव वाहतूक सेनेच्या संघटनेत महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. जळगाव येथील नंदू पाटील यांची महाराष्ट्र शिव वाहतूक सेनेच्या जिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.**

या नियुक्तीचे अधिकृत पत्र महाराष्ट्र शिव वाहतूक सेनेचे प्रदेशाध्यक्ष



शिवाजी भोर यांनी नुकतेच प्रदान केले. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी व संघटना वाढीसाठी सक्रियपणे कार्य कराल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

नंदू पाटील यांची ही नियुक्ती एका वर्षाच्या कालावधीसाठी असणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल राजकीय आणि सामाजिक स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, शिव वाहतूक सेनेच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यात वाहतूकदारांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना बळ मिळणार आहे.

या निवडीबद्दल नंदू पाटील यांनी शिवसेना नेतृत्वाचे आभार मानले आहेत.

## वनकोठे, बांभोरी, खडके बुद्रूक येथे ग्रामपंचायत सदस्यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । एरंडोल

तालुक्यातील कासोदा, वनकोठे, बांभोरी ग्रुप ग्रामपंचायत येथे आशाबाई गोरख मोरे यांची बिनविरोध निवड झाली. या बिनविरोध निवड प्रक्रियेसाठी राष्ट्रवादी पक्ष (शरद पवार) तालुकाध्यक्ष व माजी लोकनियुक्त सरपंच उमेश पाटील, प्रमोद पाटील, लोकनियुक्त सरपंच लताबाई मोरे, दीपाली पाटील, साधना मोरे, गोपीचंद पाटील, दादा खैरनार, पिंटू पाटील, भुरा अण्णा, भगवान मोरे, भागवत मोरे, भीमा मोरे, जितू मोरे इत्यादींनी प्रयत्न केले. आशाबाई मोरे यांचे सर्वांनी अभिनंदन केले. खडके बुद्रुक येथे सौ सीमा दिपक पाटील बिनविरोध खडके बुद्रुक येथील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत प्रभाग तीन मधून सौ. सीमा दीपक पाटील या बिनविरोध निवडून आल्या. त्यांच्या बिनविरोध निवडीसाठी एकनाथ यादव पाटील, राष्ट्रवादी पक्षाचे (शरद पवार) तालुकाध्यक्ष उमेश पाटील, उमेश काबरा, मंगेश पाटील, जगदीश साळुंखे, दीपक पाटील, दयाराम पाटील, राजेंद्र पाटील, विलास निळे, राजेंद्र पाटील, आधार पाटील इत्यादींच्या नेतृत्वात ही निवड प्रक्रिया बिनविरोध झाली. सर्वांनी यशस्वी उमेदवाराचे अभिनंदन केले.

## आदर्श हिंदी स्कूलमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

प्रतिनिधी । जळगाव

रोटरी क्लब हुमिनिटी जळगावच्या वतीने, जळगाव शहर महानगरपालिका संचलित आदर्श हिंदी स्कूल, संत कंवरराम नगर, सिंधी कॉलनी येथे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता पार पडलेल्या या उपक्रमात गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, पेन सेट तसेच वॉटरबॅग यांसारख्या अत्यावश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

## मेहुणबारे येथे समाधान शिबिरात १०७३ लाभार्थ्यांना विविध लाभांचे वितरण

प्रतिनिधी । चाळीसगाव

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोंढे तालुका चाळीसगाव येथे मेहूनबारे महसूल मंडळ स्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजन दि.१७एप्रिल २०२६ रोजी करण्यात आले होते. सदर शिबिरात सर्व विभागांचे मिळून एकूण १०७३ लाभ विविध लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले आहेत.**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमा पूजन करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार प्रशांत पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य आबासाहेब धर्मा रामा वाघ, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्राध्यापक सुनील निकम आदी मान्यवर यांच्या हस्ते



करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर विविध प्रशासकीय विभागांनी शासकीय योजनांची माहिती देणे, लाभार्थ्यांना थेट लाभ देणे यासाठी लावलेल्या स्टॉलची पाहणी करतांना उपस्थित अधिकाऱ्यांना लोकाभिमुख काम करण्याच्या सूचना तहसीलदार प्रशांत पाटील यांनी दिल्या. यानंतर उपस्थित नागरिकांना संबोधित करतांना त्यांनी समाधान शिबिरे आयोजित करण्यामागची शासनाची भूमिका स्पष्ट करत शासनाने सुरू केलेली ही शिबिरे म्हणजे शासन, प्रशासन नागरिकांच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे उत्तम उदाहरण असून चाळीसगाव तालुक्यात सुरू असलेली समाधान शिबिरे उत्तम प्रकारे संपन्न होत असल्याबद्दल सर्व प्रशासकीय विभागांचे कौतुक केले. विविध दाखले, शिधापत्रिका, दुरुस्त सातबारे यासह इतर विभागांच्या लाभांचे वितरण तहसीलदार आणि व्यासपीठावरील सर्व मान्यवर हस्ते करण्यात आले. यावेळी तहसीलदार प्रशांत पाटील, सहायक गटविकास अधिकारी सतीलाल सोनवणे, गट शिक्षण अधिकारी विलास भोई, उत्पन्न बाजार समितीचे संचालक नवल दादा पवार, शैलेंद्र पाटील सरपंच ग्रामपंचायत लेढि राहुल हिरामण सोनवणे, दिनकर भाऊ राठोड, संदीप महाराज, डॉक्टर बाफना, प्रवीण पुंडलिक राठोड, तसेच मंडळातील सर्व ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच नायब तहसीलदार डॉ संदेश निकुंभ, भानुदास शिंदे, नायब तहसिलदार, पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती जोशना हनवटे, मंडळ अधिकारी विष्णू कुमार राठोड सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक उपस्थित होते. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख व त्यांचे कर्मचारी उपस्थित होते.

## भूमी सुपोषण अभियान, राष्ट्रीय चळवळ मासिक जनजागराची भूमिपूजनाने सांगता

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील श्री मंगळग्रह मंदिरात रविवार, दि. १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ मासिक जनजागर सोहळ्याची अतिशय भक्तीमय आणि चैतन्यमय वातावरणात विधिवतरीत्या सांगता झाली. या जनजागर अभियानाचा शुभारंभ अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ष प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचे औचित्य साधत गेल्या १९ मार्च २०२६ रोजी विविध मंत्रिमहोदयांसह शेतकऱ्यांच्या साक्षीने करण्यात आलेला आहे.**

आजच्या सांगता सोहळ्याप्रसंगी



प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, कृषिभूषण राजश्री राजेश पाटील (हिंगोणा, ता.अमळनेर ), पोलीस पाटील विश्वास महाजन, माजी उपसरपंच पुंजू पाटील (शिरूड), महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे योगेश वंजारी, दिनेश पाटील, दीपक चौधरी, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त डी. ए. सोनवणे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, मंगल सेवेकरी अनिल कदम, आर. टी. पाटील, व्ही. व्ही. कुलकर्णी यांच्यासह अमळनेरसह परिसरातील विविध खेड्यांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरूवातीला विविध गावांतील शेतकऱ्यांनी आणलेली एक मूठ माती भांड्यात एकत्रित करण्यात आली. त्यानंतर जागेचे मंडल तयार करून संबंधित जागा मंत्रोपचाराच्या माध्यमातून शुद्ध करण्यात आली. मंडलाच्या जागेत सर्व माती एकत्रित करून विविध महानुभाव व शेतकऱ्यांच्या साक्षीने आचमन, प्राणायाम, गणपती बाप्पांचे स्मरण, प्रधान संकल्प करून गणपती बाप्पांचे विधिवत पूजन करण्यात येऊन भूमी अभिमंत्रण विधी करण्यात आला.

## राज्यस्तरीय इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धेत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे यश



प्रतिनिधी । चोपडा

तालुक्यातील अकुलखेडे येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपल्या ज्ञानाच्या जोरावर यशाचे शिखर सर केले आहे. एल.एफ. डब्ल्यू. (डत्रथ) संस्थेमार्फत इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'इंग्रजी ऑलिम्पियाड' स्पर्धेत शाळेची विद्यार्थिनी कु. हेमाद्री भूपेंद्र महाजन हिने महाराष्ट्र राज्यात तृतीय क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

### २५ हजार विद्यार्थ्यांमधून मारली बाजी

इंग्रजी व्याकरणावर आधारित असलेल्या या कठीण स्पर्धेत संपूर्ण राज्यातून सुमारे २५ हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध फेऱ्या पार करत विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय सेमी-फायनलपर्यंत धडक मारली होती. यामध्ये इयत्ता सहावीची प्राची प्रवीण महाजन आणि आठवीची हेमाद्री भूपेंद्र महाजन यांचा समावेश होता. अंतिम फेरीत हेमाद्रीने आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत राज्यातून तिसरा क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थिनींसाठी संस्थेमार्फत सुमारे १० हजार रुपयांची बक्षिसे पाठवण्यात आली. आज विद्यालयात पालक आणि शिक्षकांच्या उपस्थितीत या विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

हेमाद्री महाजन (राज्य तृतीय): हिला स्टडी टेबल, स्कूल बॅग, वॉटर बॉटल, टिफिन बॉक्स आणि इतर शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. प्राची महाजन (सेमी-फायनलिस्ट): हिला देखील विशेष शैक्षणिक साहित्याचे संच देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

### शिक्षिका दीपावली पाटील यांचा क्टिव्ह टीचर म्हणून गौरव

या विद्यार्थिनींना इंग्रजी विषयाचे उत्कृष्ट मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती दीपावली विनायक पाटील यांना संस्थेमार्फत 'फक्टिव्ह टीचर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.एस.पाटील यांनी दिपावली मॅडम यांच्या मार्गदर्शनाचे आणि कष्टाचे विशेष कौतुक केले.

या यशाबद्दल अकुलखेडे ग्रामस्थ, शिक्षक वृंद आणि पालकांनी सर्व विजेत्यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आहे.

## संत सखाराम महाराज यात्रोत्सवाचा स्तंभारोपण, ध्वजारोहणाने शुभारंभ

### २७ एप्रिलला रथोत्सव व १ मे रोजी होणार पालखी सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी । अमळनेर

**सालाबादप्रमाणे यंदाही विठ्ठल- रुक्मिणी संस्थान अमळनेर पंढरपूरच्या वतीने श्री संत सखाराम महाराज यांचा वार्षिक यात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या उत्सवाची जय्यत तयारी संस्थानतर्फे सुरू करण्यात आली आहे.**

दि.१९ एप्रिल रोजी अक्षय तृतीयेनिमित्त संस्थानचे गादीपुरुष परमपूज्य संत श्री प्रसाद महाराज यांचे उपस्थितीत स्तंभारोपण व ध्वजारोपण



होऊन यात्रोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.

बोरी नदीपत्रात लोकप्रतिनिधी शासकीय अधिकारी व भाविक भक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.

२६ एप्रिल रोजी मोहन महाराज बेलापूरकर यांच्या दिंडीचे आगमन होऊन दि.२७ एप्रिल रोजी वैशाख शुद्ध मोहिनी एकादशीला सायंकाळी रथोत्सव असून दि.१ मे रोजी वैशाख शुद्ध पौर्णिमेला सकाळी ६ पासून पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

दरम्यानच्या काळात अनेक विशेष कार्यक्रम पार पडणार आहे.यात्रोत्सवात खेळणी, दुकाने, पाळणे , हॉटेल व इतर दुकाने उभारण्याची तयारी सुरू झाली आहे.

**● नदीच्या पूर्व तिरावर वसलेले पैलाड व पश्चिम तिरावर असलेले अमळनेर. (अमल- म्हणजे मल नसलेले) पश्चिमेकडील भागातून बोरी नदी पात्रात दक्षिणेकडे उतरल्यानंतर दिसून येणाऱ्या चार संत पुरुषांच्या समाध्या व उत्तरेकडे नजर टाकली तर दिसणारा दगडी पूल, त्याच्या पलीकडे भुसावळ- सुरत मार्गाचा रेल्वेपूल हे सर्व पाहिले की क्षणभर पंढरपूर येथील चंद्रभागेच्या वाळवंटात उभे असल्याचा भास भाविकांना होतो.**